THANE POLICE COMMISSIONERATE

# जन संपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

## P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY

Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalwa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819208279

प्रेस नोट क्रमांक - दिनांक - ०६/०९/२०२४

## गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी ची कामगिरी

**" गांजा या अंमली पदार्थाची तस्करी करणारे आंतराज्यीय टोळीतील सकीय सदस्यांसह एकुण ०९ आरोपी अटक करून ५५३ किलो वजनाच्या गांजा या अंमली पदार्थासह २,८७,६१,६८०/- रू. किमतीचा मुद्देमाल हस्तगत "**

————————————ooooooooo————————————

ठाणे पोलीस आयुक्तालयातील अंमली पदार्थ विक्री, वितरण, साठवणुक, उत्पादन, सेवन करणारे इसमांचा शोध घेवुन प्रचलित कायद्यांतर्गत कारवाई करणेबाबत मा. पोलीस आयुक्त, ठाणे यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे डॉ. श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे श्री. शिवराज पाटील, मा. सहा. पोलीस आयुक्त, शोध - १, गुन्हे ठाणे, श्री. शेखर बागडे यांच्या मार्गदर्शावरून मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. योगेश आव्हाड यांनी गुन्हे शाखा घटक २, भिवंडी चे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने परिमंडळ २, भिवंडी मधील सर्व पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात अंमली पदार्थ विक्री, वितरण, साठवणुक, उत्पादन, सेवन करणारे इसमांचा शोध सुरू करण्यात आला.

त्याअनुषंगाने माहिती घेत असताना दिनांक ०१/०९/२०२४ रोजी इकडील नेमणुकीतील पोशि/१९९७ अमोल इंगळे यांना प्राप्त माहितीच्या आधारे, मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शानाखाली सापळा कारवाई करून, दिनांक ०२/०९/२०२४ रोजी ००.०५ वा. रांजनोली नाका, हायवेलगत असलेल्या, मुंबई नाशिक महामार्गाच्या डावे बाजुस असलेल्या पाईपलाईन रोडवर, भिवंडी, जि. ठाणे येथे आरोपी नामे १) पती राम पंगी उर्फ सुरज वय ३८ वर्षे, रा. ठि. गांव बला, ता. पाडवा, जि. कोरापुर, ओरिसा, २) अर्जुन लचना शेट्टी, वय २० वर्षे, रा. गांव बला, ता. पाडवा, जि. कोरापुर, ओरिसा, ३)अमीन बाबु सैय्यद, वय ३९ वर्षे, रा. मु. पो. कलमबाद, ता. लोहा, जि. नांदेड यांनी ओरिया येथुन गांजा हा अंमली पदार्थ मिळविला. त्यानंतर तो ओरिसा येथुन भिवंडी येथे वाहतुक करण्यासाठी आरोपी नामे ४) सलीम गुलामनबी शेख, वय ३० वर्षे, रा. ठि. - शरीफ कॉलनी, रोशन गेट, कली डॉक्टर यांची गल्ली, गल्ली नंबर १, संभाजीनगर, ५) इमरान हाजी अहमद शेख, वय ३६ वर्षे, रा. ठी. इदगाह रोड, आयडीयल कॉलेजच्या समोर, झोपडपट्टी, भिवंडी, जि. ठाणे, ६) रमजान वकील अहमद अन्सारी, वय २५ वर्षे, रा. ठि. आसबीबी, पावर हाऊस, भिवंडी, जि. ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आला. सदर आरोपी यांनी गांजा हा अंमली पदार्थ घेवुन स्वतःचे ताब्यातील अशोक लेलंड कंपनीचा तपकिरी रंगाचा टेंम्पो क्रमांक **MH/48/CQ/2065** असा असताना सदर टेंम्पोवर **MH/04/LE/1743** हा बनावट नंबरप्लेट लावुन सदरचा टेंम्पोमधुन गांजा हा अंमली पदार्थ ओरिसा येथुन भिवंडी येथे घेवुन आले. आरोपी नामे ७) नाजीम हाफीज फराद अन्सारी, वय ४७ वर्षे, रा. ठि. रूम नंबर १०, नागवा चाळ, इदगाह रोड, भोईवाडा, भिवंडी, जि. ठाणे, ८) अमीत उर्फ किरण रंगराव सोनोने, वय ३५ वर्षे, रा. ठि. रूम नंबर ००१, जय साईराम फेंज , बि विंग, बापगांव, ता. कल्याण, जि. ठाणे, ९)मार्कस मार्टीन म्हस्के, वय ३६ वर्षे, रा. ठि.

भिमनगर, विठ्ठलवाडी, उल्हासनगर नंबर ४, जि. ठाणे यांनी आरोपी क्रमांक १ ते ३ यांनी विक्री करीत आणलेल्या गांजा हा अंमली पदार्थ खरेदी करून तो विक्री करीता घेवुन जात असताना मिळुन आले.

अशा प्रकारे वर नमुद आरोपी क्रमांक १ ते ३ यांनी ओरिसा येथुन मानवी शरीरावर परिणाम करणारा गांजा हा अंमली पदार्थ मिळविला. आरोपी अ. क्रं. ४ ते ६ यांनी स्वत:चे कब्जातील टेंम्पोस बनावट क्रमांक लावुन सदरचा टेंम्पोचा मुळ क्रमांक **MH/48/CQ/2065** हा असताना **MH/04/LE/1743** असा असल्याचे भासवण्याचे उद्‌देशाने सदरचा टेंम्पो जवळ बाळगुन त्याचा क्रमांक **MH/04/LE/1743** हा खरा आहे म्हणुन वापरून सदर टेंम्पोमध्ये अ. क्रं. १ ते ३ यांनी दिलेला गांजा या अंमली पदार्थाची ओरिसा ते महाराष्ट्र अशी वाहतुक केली. तसेच आरोपी अ. क्रं. ७ ते ९ यांनी आरोपी क्रं. १ ते ३ यांच्याकडुन गांजा हा विक्रीकरीता आरोपी क्रमांक १ ते ६ यांच्याकडुन खरेदी करून घेवुन जात असताना मिळुन आले. त्यांच्या ताब्यात एकुण ५५३.६०० किलो ग्रॅम वजनाचा ओलसर हिरवट मळकट पान फुलांचा गांजा हा अंमली पदार्थ बेकायदेशिररित्या विक्रीकरीता आपले कब्जात बाळगला तसेच रोख रक्कम, मोबाईल फोन, टेंम्पो असा एकुण **२,८७,६१,६८० /-** किंमतीचा मुद्‌देमाल त्यांचे जवळ मिळुन आला आहे. सदरबाबत कोनगांव पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गुन्हा नोंद क्रमांक ८६४/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २० (ब ) ii (क ), २९, सह भारतीय न्याय संहीता चे कलम ३३८, ३३९, ३४० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा घटक २, भिवंडी मार्फत सुरू आहे. अंमली पदार्थाचे उत्पादन, वितरण, विक्री या साखळीमधील सर्व आरोपी निष्पन्न करून त्यांना अटक करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. योगेश आव्हाड, सपोनि/ धनराज केदार, पोउपनि/ निसार तडवी, पोहवा/ अमोल देसाई, प्रकाश पाटील, सुनिल साळुंखे, शशिकांत यादव, सचिन साळवी, रंगनाथ पाटील, साबिर शेख, वामन भोईर, मंगेश शिर्के, सचिन जाधव, पोशि/ अमोल इंगळे, भावेश घरत, उमेश ठाकुर, नितीन बैसाणे, रविंद्र साळुंखे यांनी केली आहे.

---------ooooo---------